राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

रासनिप्रा

जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड,पुणे - ४११००१.
फोन नं. - (०२०) २६०५०६४१ मेल आयडी - sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-१४/ तालिका अभियोक्ता / ८९५३ /२०२५ दिनांक : १४/१०/२०२५

# -: जाहीर निवेदन :-

मा.उच्च न्यायालय मुंबई, सर्कीट बेंच कोल्हापूर न्यायालयातील सहकारी संस्थांच्या निवडणूकी विषयक वादांमध्ये प्राधिकरण व प्राधिकरणाधिकृत निवडणूक अधिकारी यांच्यातर्फे बाजू मांडणेसाठी व प्रकरणे हाताळण्यासाठी, पात्र व इच्छूक अभियोक्त्यांकडून प्राधिकरणाच्या नामतालीकेवर (Empanelment) निवड करण्यासाठी, सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे, जुनी मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे-४०० ००१ यांचेकडून विहीत नमुन्यात आवेदन पत्र मागविण्यात येत आहेत.

अर्जदारांनी जाहीरात,अर्जाचा नमुना, नेमणूकीसाठी पात्रता, अर्जासोबत सादर कराव्या लागणा-या स्वयं साक्षांकीत प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती /कागदपत्रे. इत्यादीची माहिती मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे संकेतस्थळ www.sahakarayukta.com व राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे https://scea.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर upload केलेला आहे. तरी इच्छूक अभियोक्त्यांनी/ वकीलांनी दिनांक **दि.१७/११/२०२५पर्यन्त सदरचे अर्ज प्राधिकारणाच्या उपरोक्त पत्त्यावर पोस्टाव्दारे अथवा प्रत्यक्ष अथवा** sceapune@gmail.com या इमेलवर सादर करावेत. तसेच सदर अर्ज प्राधिकरण्याच्या कार्यालयातही उपलब्ध आहेत.मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आवेदन पत्राचा विचार केला जाणार नाही.

**सचिव**
**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

**ठिकाण — पुणे**
**दिनांक — १४.१०.२०२५**

16/Kolhapur adv panel sept 2025

**जोडपत्र (अ)**

**जाहिरात**

**राज्य**

**सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे**

**(रा.स.नि.प्राधिकरणाच्या वकील तालिकेवरील नियुक्तीसाठी)**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांना मा.उच्च न्यायालय मुंबई ,सर्कीट बेंच कोल्हापूर पुढे दाखल निवडणूकी विषयक वादामध्ये प्राधिकरण व प्राधिकरणातर्फे प्राधिकृत निवडणूक अधिकारी यांच्यातर्फे न्यायालयात हजर होऊन बाजू मांडणेसाठी व प्रकरणे हाताळण्यासाठी पात्र व इच्छूक अधिवक्त्यांची प्राधिकरणाचे तालिकेवर नियुक्तीसाठी सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे, जुनी मध्यवर्ती इमारत, पुणे, दुरध्वनी क्रमांक- ०२०-२६०५०६४१,२९७०६४११ यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | न्यायालय | तालिकेवर अतिरीक्त अधिवक्त्याची संख्या |
|---|---|---|
| १ | मा.उच्च न्यायालय मुंबई, सर्कीट बेंच कोल्हापूर | १ |

(अ) रा.स.नि.प्राधिकरणाच्या मा. उच्च न्यायालयापुढील प्रकरणे चालविण्यासाठी वकील तालिकेवरील नियुक्तीसाठी जाहिरात जोडपत्र (अ) प्रमाणे

(आ) अर्जाचा नमुना जोडपत्र (ब) प्रमाणे

(इ) प्राधिकरणाच्या तालिकेवर नेमणूकीसाठी पात्रता व जोडावी लागणारी कागदपत्रे जोडपत्र (क) प्रमाणे

(ई) अभियोक्त्यांची तालिकेवरील निवडीसाठी मुलाखत पत्र जोडपत्र (ड) प्रमाणे

(उ) प्राधिकरणाच्या तालिकेवर निवडावयाच्या अभियोक्त्याची वैयक्तिक माहिती जोडपत्र (इ)प्रमाणे

(ऊ) निवड समितीची .रचना जोडपत्र (ई)प्रमाणे

(ऋ) नेमणूक आदेशाचा प्रारूप मसुदा जोडपत्र (उ) प्रमाणे

(ऌ) विहित नमुन्यातील अर्ज **दि. १७/११/२०२५** पर्यंत सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे, जुनी मध्यवर्ती इमारत पुणे, दुरध्वनी क्रमांक- ०२०-२६०५०६४१,२९७०६४११ या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करावा. या तारखेनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

(ऍ) काही उमेदवारांनी जाहिरातीपूर्वी अर्ज सादर केलेले असले तरी त्यांना ह्या जाहीरातीप्रमाणे नव्याने अर्ज सादर करावे लागतील. जाहिरातीपूर्वी सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

(ऎ) अर्जाच्या छाननीत पात्र ठरणा-या उमेदवारामधून तालिकेवरील वकिलांची मुलाखतीव्दारे निवड करण्यात येईल. मुलाखतीचा दिनांक पात्र उमेदवारांना नंतर कळविण्यात येईल. मुलाखतीस उपस्थित राहणा-या उमेदवारांना कोणताही प्रवास खर्च/ भत्ता दिला जाणार नाही.

(ए) प्राधिकरणाच्या तालिकेवर नेमणूक झालेल्या अभिवक्त्यांना प्राधिकरणाने वेळोवेळी विहीत केल्याप्रमाणे प्रकरणपरत्वे वकिली शुल्क देय असेल. याव्यतिरिक्त इतर कोणतेही आर्थिक लाभ मिळणार नाहीत.

(ऐ) उमेदवारांनी आपला अर्ज बंद लिफाफ्यातून सादर करावयाचा असून त्या लिफाफ्यावर **"राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या तालिकेवरील वकिलांच्या नेमणूका "** साठी अर्ज असे ठळक रितीने नमूद करावे आणि त्याच लिफाफ्यात अर्जदाराने अर्जासमवेत रु.७०/- किमतीची तिकिटे (पोस्टेज स्टॅम्प्स) चिकटविलेला आणि स्वत:चा पत्ता लिहिलेला लिफाफा पाठवावा.

(ऑ) अटी, शर्ती व सूचनांची पूर्तता न करणारे अर्ज छाननीत अपात्र ठरविण्यात येतील.

(अशोक गाडे)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य पुणे

स्थळ —पुणे
दि.१४.१०.२०२५

4/Kolhapur adv panel sept 2025

जोडपत्र -(ब)

**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे मा.उच्च न्यायालय मुंबई ,सर्कीट बेंच कोल्हापूर वकिल तालिकेसाठी अर्जाचा नमुना**

| उमेदवाराचा नजीकच्या काळातील पासपोर्ट साईज फोटो |
|---|
| |

१. अर्ज केलेले पद –

२. अर्जदाराचे पुर्ण नाव –

३. पत्र व्यवहारासाठी पूर्ण पत्ता/कायमचा पत्ता

फोन नं/मोबाईल नंबर - इमेल आयडी –

४. a) जन्मदिनांक –

b) दि.०१.१०.२०२५ या तारखेस पूर्ण वय - जन्मठिकाण -

५. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी आहे काय?

(अ) अधिवासाचे ठिकाण (ब) राष्ट्रीयत्व –

६. वकीली व्यवसाय करत असलेले न्यायालयाचे ठिकाण –

७. शैक्षणिक अर्हता आणि अनुभव

(अ) उत्तीर्ण केलेल्या पदवी, पदव्युत्तर व विधि पदवी, पदव्युत्तर परिक्षा याचे विवरण –

| परिक्षेचे नाव | बोर्ड/ विद्यापीठ संस्थेचे नाव | उत्तीर्ण श्रेणी /ग्रेड | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|
| माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र | | | |
| उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र | | | |
| कला/वाणिज्य/विज्ञान पदवी प्रमाणपत्र | | | |
| विधी पदवी प्रमाणपत्र | | | |
| पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र | | | |

(ब) एकूण वकिली व्यवसायाचा कालावधी –

| उच्च न्यायालय/न्यायालय जेथे वकिली व्यवसाय करता ते ठिकाण / ठिकाणे - | उच्च न्यायालय/ न्यायालयामध्ये चालविलेले एकूण रिट याचिका निवडणूक वाद, अपील रिव्हिजन | इतर प्रकरणे |
|---|---|---|
| | | |

(क) उच्च न्यायलय यांचेपुढे नेमणूकीसाठी अर्ज करण्या लगतपूर्वी तीन वर्षात चालविलेल्या एकूण सहकार निवडणूक वादाची प्रकरणे / अपिल, रिव्हीजन, रिट याचिका.

(ड) सदर  प्रकरणे खाली नमूद विवरणपत्रात द्यावीत.

| अ. क्र. | केस नंबर | कोणासाठी हजर झालात | न्यायालयाचे नाव | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

(इ) प्राधिकरणाच्या तालिकेवर सध्या कार्यरत असल्यास नियुक्तीपासून ते अर्ज करेपर्यंत प्राधिकरणाच्या / जि.स.नि.अ. / ता.स.नि.अ. यांचे वतीने चालविलेल्या प्रकरणाबाबत खालील विवरणपत्रात माहिती द्यावी.

| अ. क्र. | केस नंबर | कोणाच्या वतीने हजर झालात | न्यायालयाचे नाव | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयाचे स्वरूप | प्रलंबित असल्यास सध्याची स्टेज |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

(ई) अर्जापूर्वी लगतच्या तीन आर्थिक वर्षातील आपल्या वकिली व्यवसायातून प्राप्त एकत्रित उत्पन्न नमूद करावे. सदर कालावधीसाठी परमनंट अकाऊंट नंबर व आयकरच्या प्रपत्राची छायांकित प्रत सादर करावी.

८. ज्ञात भाषा – वाचता येणे,लिहिता येणे, बोलता येणे

९. i) आपणास कधी अटक झाली आहे का? — होय किंवा नाही

ii) कधी बंदिवासात राहिलात का?

iii) फौजदारी गुन्ह्यासाठी शिक्षा झाली का?

iv) आपल्या विरोधात कोणत्या गुन्ह्यासाठी फौजदारी खटला चालू आहे का?

१०. आपल्या विरूध्द बार कौन्सिल ऑफ इंडिया किंवा बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र, गोवा किंवा कुठल्याही बार  असोसिएशनमार्फत गैरवर्तणूकीसाठी शिस्तभंग विषयक  कार्यवाही चालू आहे का? — होय किंवा नाही

११. असल्यास वकिली व्यवसाय सुरु करण्यापूर्वीची सेवा विषयक माहिती

| धारण केलेले पद | रुजू दिनांक | सेवा सोडल्याचा दिनांक | कारण |
|---|---|---|---|
| | | | |

**घोषणापत्र**

मी -------------------------------- ह्याव्दारे शपथपूर्वक खरे सांगतो/सांगते की, अर्जामध्ये नमूद केलेली माहिती माझे ज्ञान व माहितीप्रमाणे खरी व बरोबर असून ती खोटी किंवा चुकीची आढळल्यास माझी प्राधिकरणाच्या वकिल तालिकेवरील नेमणूक आपोआप रद्द ठरेल आणि मी कायद्याप्रमाणे पुढील कार्यवाहीस पात्र असेन.

**दिनांक -**

**स्थळ -** **अर्जदाराची सही**

- **महत्वाच्या सूचना –**

i) अर्जदार उमेदवाराने सर्व प्रमाणपत्राच्या स्व-सांक्षाकीत प्रती अर्जासोबत जोडाव्यात.

ii) अपूर्ण, सही नसलेले प्रमाणपत्राच्या छायांकीत प्रती न जोडलेले, सूचनांचे पालन न करता सादर केलेले आणि वेळेच्या आत सादर न केलेले अर्ज रद्द समजण्यात येतील.

**जोडपत्र – (क)**

**प्राधिकरणाच्या तालिकेवर वकील म्हणून नेमणूकीसाठी पात्रता –**

**मा.उच्च न्यायालय मुंबई ,सर्कीट बेंच कोल्हापूर** न्यायालयापुढे प्राधिकरणाची / निवडणूकीचे कर्तव्य पार पाडणा-या अधिका-यांची बाजू मांडणेसाठी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या तालिकेवर घेण्यासाठी संबंधित वकीलाकडे खालील नमूद पात्रता असाव्यात.

१. तो कायद्याव्दारे मान्यताप्राप्त विद्यापीठाने मान्य केलेल्या विधि शाखेचा पदवोधर असावा.
२. महाराष्ट्र बार असोसिएशनकडे अभियोक्ता म्हणून नोंदणी झालेला असावा.
३. मा उच्च न्यायालयापुढे कमीत कमी १० वर्षाच्या वकिली व्यवसायाचा अनुभव असावा.
४. तालिकेवर निवड करताना विधि मध्ये पदव्युत्तर पदवी, डॉक्टरेट तसेच सहकारी संस्थांशी संबंधित निवडणूक विषयक प्रकरणे हाताळण्याचा जास्तीत जास्त अनुभव असणा-या व्यक्तीला विशेष प्राधान्य देण्यात येईल.

**<u>सादर कराव्या लागणा-या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती/ कागदपत्रे –</u>**

१. विधि पदवी उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र (Passing certificate)
२. विधि पदवी प्रमाणपत्र
३. विधि पदवी गुणपत्रिका व असल्यास पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रिका
४. महाराष्ट्र बार कौंसिलचे अभियोक्ता म्हणून नोंदणी प्रमाणपत्र
५. ज्या उच्च न्यायालयापुढे वकीली व्यवसाय करता त्या उच्च न्यायालयाच्या अभिवक्ता संघाचे संबंधित उच्च न्यायालयापुढे १० वर्षापासून वकील व्यवसाय करीत असल्याचे प्रमाणपत्र.
६. वैद्यकीय परिषदेकडे नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीने, शारिरिकदृष्ट्या सुदृढ असल्याचे प्रमाणित करणारे प्रमाणपत्र.
७. सहकार कायद्याशी संबंधित चालविण्यात आलेल्या निवडणूक विषयक प्रकरणांची यादी तसेच उपलब्ध न्यायालयीन आदेशाच्या प्रती.
८. महाराष्ट्र अँण्ड गोवा बार कौन्सिलची सनद.